N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** गडचिरोली **Year (वर्ष):** 2020
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0428 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/09/2020 20:12 बजे
2. 

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार
      **Time Period (कालावधी):** पहर 5
      **Date From (दिनांक पासून):** 23/09/2020
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/09/2020
      **Time From (वेळेपासून):** 13:59 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 15:17 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 23/09/2020 **Time (वेळ):** 19:15 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/09/2020 20:12 बजे
4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** गडचिरोली

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** गडचिरोली
   **District(State) (जिल्हा(राज्य)):** गडचिरोली(महाराष्ट्र)
6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** यश प्रदिप भोयर
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिवाजी वार्ड, देसाईगंज,देसाईगंज,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिवाजी वार्ड, देसाईगंज,देसाईगंज,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबाराव शंकरराव बाहे | | | 1. सा बां विभाग क्र1 गडचिरोली,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत<br>2. रामकृष्ण नगर दिघोरी नागपुर,नागपुर, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे चे 2 नोटा | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 23/09/2020नांव:- श्री यश प्रदिप भोयर, वय 25 वर्षे, धंदा-शिक्षण, रा. शिवाजी वार्ड, देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. मो.नं. 8390518585, 9637660065.मी दिनांक 23/09/2020 रोजी श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.माझे पॉलीटेक्नीकचे स्थापत्य अभियांत्रीकीचे शिक्षण झाले असुन मौजा देसाईगंज येथे रहातो. माझे वडील श्री प्रदीप देवराव भोयर हे सार्वजनीक बांधकाम उपविभाग, देसाईगंज येथे सि.आर.टी. लेबर म्हणुन नौकरी करीत होते. सन 2016 मध्ये माझ्या वडीलांना अर्धांगवायुचा आजार झाल्याने मौजा नागभिड व नागपुर येथे दवाखाण्यात उपचार करण्यात आला. परंतु माझे वडीलांचे दि. 8.5.2018 रोजी औशधोपचार दरम्यान निधन झाले. माझे वडीलांचे वैद्यकिय औशधोपचाराचे देयक मिळणे करीता कागदपत्र सार्वजनीक बांधकाम उपविभाग, देसाईगंज येथे सादर केले असता तिथुन सदर देयक मंजुरी करीता कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली यांचे कार्यालयात पाठविण्यात आले. त्यानंतर दोन देयकाच्या रकमेचे चेक माझी आई नामे गं.भा. रजनी प्रदीप भोयर हिचे नावे प्राप्त झाले. परंतु अद्यापही चार बिलची रक्कम मिळाली नसल्याने आज दि. 23.09.2020 रोजी सकाळी सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली येथील श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक यांना माझे मोबाईल वरुन मोबाईल क्रं. 7756030608 वर संपर्क साधुन बिलाचे चेक बाबत विचारपुस केली असता त्यांनी मला चार बिलाचे चेक तयार करुन पाहीजे असल्यास मला 1,000/- रु. द्यावे लागतील तेव्हा मी त्यांना काय साहेब माझे वडील तर तुमच्याच विभागात काम करीत होते. तरी सुध्दा पैसे लागतात काय, मला सुध्दा काहीही काम नाही व सध्या पैषाची अडचण आहे असे म्हणालो तेव्हा त्यांनी मला तुला पैसे द्यावेच लागेल, नाहीतर तुला चेक मिळणार नाही असे म्हणाले त्यामुळे मी घाबरुन ठिक आहे साहेब नंतर येवुन भेटतो, लवकर काम करा असे म्हणालो. त्यावर त्यांनी ठिक आहे असे म्हणुन मला पैषाची मागणी केलेली आहे. श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली, जिल्हा गडचिरोली हयांनी माझे वडीलांचे औशधोपचाराच्या बिलाचे चेक तयार करुन देण्याचे कामाकरीता मला रू. 1,000/- लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली जिल्हा गडचिरोली यांना रु. 1,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु. 1,000/- सोबत घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो. श्री बाबाराव बाहे, प्रथम

लिपीक सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली, जिल्हा गडचिरोली यांचेषी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेषिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहो. मी सोबत आणलेले रु. 1,000/- हे माझे वैयत्तिक बचतीतील आहेत. त्यानंतर श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक, यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री यशवंत राऊत साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री यषवंत राऊत यांनी सुध्दा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी व्हॉईस रेकॉर्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री यशवंत राऊत यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 1,000/- (रू. 500/- दराच्या 2 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचे सह सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 कार्यालय गडचिरोली येथे जाण्यास रवाना केले. मी सार्वजनीक बांधकाम विभाग क्रं. 1 कार्यालय गडचिरोली येथे श्री बाबाराव बाहे साहेबांना भेटण्यास गेलो असता, त्यांनी मला माझे वडीलांचे औशधोपचाराच्या बिलाचे चेक तयार करुन देण्याचे कामाकरीता रू. 1,000/- लाच रकमेची स्पष्ट मागणी करून थोडयाच वेळात लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक साहेबांनी मला माझे वडीलांचे औशधोपचाराच्या बिलाचे चेक तयार करुन देण्याचे कामाकरीता रु. 1,000/- लाच रकमेची मागणी करून थोडयाच वेळात स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे फुलपंटच्या उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर तोंडाला बांधलेला रुमाल काढुन इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली येथे श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक यांचे कार्यालयात गेलो असता, त्याठिकाणी श्री बाबाराव बाहे साहेब हजर होते. त्यावेळी मी अँथ्रसिन पावडर लावलेल्या रू. 1,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिश्यातुन काढुन श्री बाबाराव बाहे साहेब यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू. 1,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजून त्यांचे शर्टच्या डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे तोंडाला बांधलेला रुमाल काढुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री बाबाराव बाहे, प्रथम लिपीक यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री यषवंत राऊत यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री बाबाराव षंकरराव बाहे, वय 56 वर्षे, धंदा नौकरी, प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. 1 गडचिरोली, ता. जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला माझे वडीलांचे औशधोपचाराच्या बिलाचे चेक तयार करुन देण्याचे कामाकरीता रू. 1,000/- (एक हजार रूपये) लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेषीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ( यशवंत राऊत ) पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, गडचिरोली.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): YASHWANT KISAN RAUT
**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): DGPYKRM6401 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Yash Bhoyar

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी ऑफिसर
पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): DNYANESHWAR DATTATRAYA
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): PCMH94069

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) 1 | Sex (लिंग) 2 | Date/Year of Birth (जन्म 3 | Build (बांधा) 4 | Height (cms.) (उंची 5 | Complexion (रंग) 6 | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) 7 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities 8 | Teeth (दात) 9 | Hair (केस) 10 | Eyes (डोळे) 11 | Habit(s) (सवयी) 12 | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) 13 |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)